दै. गोदातीर दि. ०८/१२/२५

# गांजाची शेती करणारा अटकेत; १९ किलो गांजा जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यातील निळा येथे गांजाची शेती करणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ४ डिसेंबर रोजी रात्री अटक केली. त्याच्या शेतातून जवळपास दोन लाख रुपयांचा १९ किलो गांजा जप्त करून आरोपीविरुद्ध सोनखेड पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

त्यावरून पोलीस निरीक्षक खंडेराय यांनी आपल्या सोबत पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार मिलिंद नरबाग, प्रमोद जोंधळे, संदीप घोगरे, बालाजी कदम, विनायक मठपती, इम्रान शेख, संतोष बेलूरोड, अमोल घेवारे यांना घेऊन सायबरचे राजू सिटीकर, दीपक ओढणे यांची मदत घेत वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कारवाईसाठी उपविभाग कंधार व इतवारा हद्दीमध्ये गस्त (पेट्रोलिंग) करिता रवाना झाले.

४ डिसेंबर रोजी या पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गुप्त माहिती मिळाली की, लोहा तालुक्यातील निळा शिवारात शिवाजी गणपती डांगे (वय ४० वर्षे व्यवसाय शेती रा. निळा ता. लोहा जि. नांदेड) हा त्याच्या कापसाच्या शेतामध्ये गांजाची झाडे लावून त्याची शेती करुन तो विक्री करण्यासाठी बाळगून आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने शेतामध्ये गांजाची झाडे वजनी १९.४८० किलो (किं, अं १,९४,८००/-) रुपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला.